**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६**

मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील काही तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत सुधारणा करणेसंदर्भात **मंजूर नियमावलीस** तसेच **मंजूरीच्या अधिसूचनेस पुरकपत्र.**

**पुरकपत्र**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**

**दि. १४ /०१/२०२१**

**वाचा :- शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) व कलम २०(३)/ नवि-१३, दिनांक ०२/१२/२०२०**

**शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) व कलम २०(३)(भाग-१)/ पुरकपत्र/नवि-१३, दिनांक : /०१/२०२१**

**शासन निर्णय :-** सोबतचे **पुरकपत्र** महाराष्ट्र शासनाच्या **साधारण** राजपत्रामध्ये **राज्यस्तरावर** प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(किशोर गोखले)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सह सचिव तथा संचालक (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/- सदरचे **पूरकपत्र** नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

२) सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना.

३) सर्व विभागीय आयुक्त.

४) सर्व जिल्हाधिकारी.

५) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.

६) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

७) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

८) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची **पूरकपत्र** महाराष्ट्र शासनाच्या **साधारण** राजपत्रामध्ये **राज्यस्तरावर** प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभागास व सर्व कार्यालयांना पाठवाव्यात.

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

१०) सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.

११) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

१३) अवर सचिव, नवि-११/नवि-३०, कक्ष अधिकारी, नवि-९/नवि-१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

१५) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचे **पूरकपत्र** या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

१६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदरचे **पूरकपत्र** शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

१७) निवडनस्ती, कार्यासन (नवि-१३).

*******

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

# अधिसूचना

(पुरकपत्र)

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक ११/०१/२०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

**क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) व कलम २०(३)(भाग-१)/पुरकपत्र/नवि-१३ :-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे / विकास प्राधिकरणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नैना, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, हिल स्टेशन नगरपालिका, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचित केलेली संवेदनशील क्षेत्रे व लोणावळा नगरपरिषद तसेच नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको कार्यरत असलेले क्षेत्र, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, मिहान, एमएडीसी, एमएसआरडीसी, ही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस ("युडीसीपीआर") (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदींनुसार, शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो.व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आलेला आहे);

आणि ज्याअर्थी, शासनाने नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोचे क्षेत्र, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्र, मल्टीमोडल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (मिहान) अधिसूचित क्षेत्र, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि.चे (एमएडीसी) शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्र आणि विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिसूचित क्षेत्र, या क्षेत्रांना उक्त मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागु करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक) व कलम २०(३) अन्वये अनुक्रमे सूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) व कलम २०(३)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० आणि सूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम २०(३)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० प्रसिध्द केल्या असून कलम १५४ नुसार अनुक्रमे निर्णय क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) व कलम २०(३)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० आणि निर्णय क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम २०(३)/ नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये निदेश दिलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील काही तरतूदी जशा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रकल्पांकरिता ॲन्सीलरी एफएसआय, प्रादेशिक योजना क्षेत्रात अपिलाची तरतूद इ. तरतूदींचे, तसेच या नियमावलीची काही क्षेत्रासाठी अंमलबजावणी करण्यासंदर्भात व्यवहार्यता इत्यादींचे पुनरावलोकन करण्याबाबत शासनाच्या अन्य विभागांकडून आणि इतर संस्थांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत;

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32 सत्यमेव जयते

आणि ज्याअर्थी, विविध निवेदने विचारात घेता आणि जनहिताच्या दृष्टीने, उक्त नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी उक्त नियमावलीतील काही तरतूदींबाबत स्पष्टीकरण अथवा सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आणि या अनुषंगाने उक्त नियमावलीतील विनियम क्र.१.१० नुसार उक्त नियमावलीस पुरकपत्र निर्गमित करणे तसेच उक्त दि.०२/१२/२०२० च्या अधिसूचनेस पुरकपत्र निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र.१.१० नुसार प्राप्त अधिकारात शासन याद्वारे उक्त नियमावलीस, यासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केल्यानुसार आणि शासनास प्राप्त अधिकारात उक्त दि.०२/१२/२०२० च्या अधिसूचनेस, यासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केल्यानुसार पूरकपत्र निर्गमित करुन सुधारणा करित आहे.

०२. या पूरकपत्रातील तरतूदी सदर पूरकपत्र महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांकापासून अंमलात येतील.

०३. सदर पुरकपत्र, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ सर्व संबंधित नियोजन प्राधिकरणे आणि नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाची जिल्हा कार्यालये या कार्यालयांमध्ये उपलब्ध राहील.

सदर पुरकपत्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने*

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

Gokhale

**(किशोर गोखले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना **क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७(१कक) व कलम २०(३)(भाग-१)/पुरकपत्र/नवि-१३, दि. १४/०१/२०२१** सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट-अ

| विनियम क्र. | शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वि.यो व प्रा.यो/कलम ३७(१कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजूर उक्त नियमावलीतील विनियम क्र.१.१० अन्वये निर्गमित पूरकपत्र |
|---|---|
| **६.१.१, तक्ता क्र.६-A साठीच्या टिप (१) मधील तिसरे परंतुक** | The following words are added in 3rd **proviso** of **Note (1) for Table No.6A**.<br><br>Provided further that, this ancillary area FSI shall be applicable to all other schemes like TOD, PMAY, ITP, IT, MHADA, etc. except **Rehabilitation component in** SRA. In the result, free of FSI items in the said schemes, if any, other than mentioned in UDCPR, shall stand deleted. |
| **६.३, तक्ता क्र.६- G खालील टिप (१) मधील दुसरे परंतुक** | The following words are added in **2nd proviso of Note (i) below Table No.6G**.<br><br>Provided further that, this ancillary area FSI shall be applicable to all other schemes like TOD, PMAY, ITP, IT, MHADA, etc. except **Rehabilitation component in** SRA. In the result, free of FSI items in the said schemes, if any, other than mentioned in UDCPR, shall stand deleted. |
| **नवीन विनियम क्र.5.11** | **5.11 Board of Appeals**<br>**Any person aggrieved by an order / communication made by an authority/Collector under these Regulations may prefer an appeal before the Board of Appeals. The board shall be constituted at division level consisting of the Divisional Head of Town Planning Department of the concerned division as President and concerned ADTP/TP of the district as a member.** |

## परिशिष्ट-ब

| | |
|---|---|
| **दि.०२/१२/२०२० रोजीच्या उक्त नियमावलीच्या मंजूरीच्या अधिसूचनेतील खंड (ब)** | **ब)** सदर मंजूर फेरबदल, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्र **व रत्नागिरी जिल्हा प्रादेशिक योजना क्षेत्र** वगळता, सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल, असे निश्चित करीत आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्राकरीता सदर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, प्राधिकरणाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये मंजूर होऊन अंमलात आल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल. **तसेच रत्नागिरी जिल्ह्याच्या प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता सदर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, या जिल्ह्याची प्रादेशिक योजना उक्त अधिनियमाच्या कलम १५ अन्वये मंजूर होऊन अंमलात आल्याचे दिनांकापासून अंमलात येईल.** |

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने*

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

Gokhale

**(किशोर गोखले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

C:\Users\Admin\Desktop\KVG\UDCPR\Unified\Final Sanction\clarrification\Addendum_UDCPR Reg.1.10.docx